Aavian Media

Aapla Vartahar
Saturday, December 12th, 2009 (Mumbai)
Page No- 8

# कपिलपा जी ऐवजी 'पा' करणार भाष्य



मोहाली : भारत-श्रीलंका यांच्यात दुसरी टी-२० मॅच शनिवारी मोहाली येथे होणार आहे. या मॅचचे मुख्य आकर्षण असेल पा सिनेमातील ऑरो फेम बिग बी अर्थात अमिताभ बच्चन. मोहालीच्या मॅचच्या निमित्ताने क्रिकेट एक्स्पर्टच्या भूमिकेत बीग बी असणार आहे. क्रिकेटचा चाहता असलेला बीग बी आयुष्यात पहिल्यांदाच मॅचबाबत एक्स्पर्ट म्हणून आपले मत मांडणार आहे.

ऑरोच्या आवाजात मॅचसाठी एक्स्पर्ट कमेंट करत अमिताभ पा सिनेमाचे प्रमोशन करणार आहे. पा सिनेमाचे दिग्दर्शक बाल्की यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. सिनेमासृष्टीतला शहेनशहा , अमिताभ वयाच्या ६७ व्या वर्षी पा सिनेमातून १३ वर्षाच्या ऑरोची भूमिका साकारत आहे. प्रोजेरियामुळे अकाली प्रौढत्व आलेल्या ऑरोची कथा सांगणारा पा हा सिनेमा अमिताभच्याच एबी कॉर्पोरेशनची निर्मिती आहे. त्यामुळे सिनेमाच्या प्रमोशनमध्ये स्वतः अमिताभनेच जास्त लक्ष घातले आहे.

एफएम आणि वृत्तवाहिन्यांना ऑरोच्या आवाजात मुलाखती देत बिग बीने पा सिनेमाचे मोठ्या प्रमाणावर प्रमोशन केले आहे. आता मॅचसाठी एक्स्पर्ट कमेंट करत अमिताभ पा सिनेमाचे आणखी प्रमोशन करणार आहे.